**नि.फौ.प्र.क्र. १५/२०२१**

**निशाणी क्र. ५७**

**<u>आरोपी क्र.१ तर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा शपथेवर पुरावा</u>**

मी शपथेवर कथन करतो/करते की,

माझे नांव – मोहन सावजी तुमसरे,

वय – ३८ वर्षे, व्यवसाय – मजुरी,

राहणार – गोंडसावरी, ता. लाखनी, जि. भंडारा.

**सरतपास आरोपी क्र.१ तर्फे वकील श्री. टी. एस. भांडारकर यांचेमार्फत–**

दि. १५/०१/२०२१ रोजी मी शिवालय कंन्स्ट्रक्शन मार्फत गोंदिया जिल्ह्यामध्ये आमगाव रोडवरती कामाला होतो. मी जानेवारी महिण्यात गोंदिया जिल्ह्यामध्ये कामाला होतो. मी २०१९ ते २०२२ या सालामध्ये होतो. मला प्रतिदिन रु.२५०/– मजुरी मिळत होती. आम्हाला एका रजिस्टरमध्ये एन्ट्री करून प्रमाणित रोजी मिळत होती. त्या महिण्याचे प्रमाणित कार्ड माझ्याकडे आहे. माझी ड्युटी सकाळी ७.०० ते रात्री ७.०० अशी होती. माझ्याकडे मेकॅनिकल वर्क म्हणून हेल्परचे काम होते. आमच्याकडे जो डांबर बनत होता त्याचा माल होता आणि त्यांना सहसा अर्ध्या तासाच्या आत वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे गोंदियामध्येच आम्ही जेवण बनवुन मेस वगैरे घेऊन राहत होतो.

**उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. वैद्य यांचेतर्फे –**

सरकारी वकिलांनी उलटतपासाकरिता थोडा वेळ मिळण्याची विनंती केली. विनंती मंजुर करण्यात येत आहे. उलटतपास थोड्यावेळाकरिता तहकुब.

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

स्वा/–

दिनांकः– ०५.०२.२०२४ (रा. सु. धडके)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लाखनी.

**नि.फौ.प्र.क्र. १५/२०२१**

**निशाणी क्र. ५७ लगतजोड**

**मध्यान्हानंतर आरोपी क्र.१ तर्फे सा.क्र.१ यांचा शपथेवर उलटतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. वैद्य यांचेतर्फे –**

२. प्रश्नः– तुमच्या म्हणण्याप्रमाणे दि. १५/०१/२०२१ रोजी तुम्ही शिवालय कंन्स्ट्रक्शन मार्फत गोंदिया जिल्ह्यामध्ये आमगाव रोडवरती कामाला होता, याबाबत कोणता दस्त तुम्ही रेकॉर्डवर दिला आहे का ?

उत्तरः– नाही.

हे खरे नाही की, मी तेथे कामाला नव्हतो म्हणून जोडले नाही.

प्रश्नः– तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही सन २०१९ ते २०२२ या सालामध्ये तेथे कामाला होता याबाबत कोणता दस्त जोडला आहे का ?

उत्तरः– नाही.

हे खरे नाही की, मी तेथे कामाला नसल्यामुळे असा दस्त जोडलेला नाही.

प्रश्नः– तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही रू.२५०/– रोजीवर कामाला होता, त्याबाबत कोणती स्लीप किंवा दस्त लावलेला आहे का ?

उत्तरः– माझ्याकडे स्लीप आहे, पण ती लावलेली नाही.

प्रश्नः– दि. १५/०१/२०२१ रोजी कामाला असल्याबाबत अशी स्लीप जोडली आहे का ?

उत्तरः– तेथे डेली नव्हते, मंथली पेमेंट मिळत होते.

हे खरे नाही की, दि. १५/०१/२०२१ रोजी मला अडीचशे रूपये रोजी मिळाली हे मी खोटे सांगत आहे. मी स्वतःहून सांगतो की, ते मी सिध्द करू शकतो.

प्रश्नः– तुमची ड्युटी त्यादिवशी दि. १५/०१/२०२१ रोजी सकाळी ७.०० ते सायंकाळी ७.०० होती याबाबत कोणता कागद तुम्ही दाखल केलेला आहे का ?

उत्तरः– माझी तेथे हेल्पर म्हणून ड्युटी होती, आमच्याकडे हजेरीबाबत कार्ड होते, ते कार्ड मी पेश करू शकतो.

प्रश्नः– त्यादिवशी तुम्ही ड्युटीवर होता याबाबत कागद दाखल करू शकता का ?

उत्तरः– पर डे चे नाही मी मंथलीचे दाखल करू शकतो.

आता मला नि.क्र.२४ वरील सही दाखविली. ती माझी सही आहे. आता मला नि.क्र.४२ वरील सही दाखविली. ती सही माझी नाही. मी बी.ए. पास आहे.

प्रश्नः– तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही मेकॅनिकल वर्कर म्हणून कार्यरत होता त्याबाबत कोणता दस्त डिग्रीचा तुम्ही दाखल केला आहे का ?

उत्तरः– हेल्पर म्हणून मी काम करीत होतो, ते काही एवढे मोठे काम नाही.

प्रश्नः– तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुमच्याकडे जो डांबर बनत होता त्याचा माल होता आणि त्यांना सहसा अर्ध्या तासाच्या आत वापर करणे आवश्यक आहे, त्याकरिता एक्सपर्ट व्यक्तीची आवश्यकता असते हे खरे आहे का ?

उत्तरः– त्याठिकाणी दुसरे असायचे. माझ्या म्हणण्याप्रमाणे जे टायर होते ते टायर पंक्चर झाले होते ते आम्ही रिपेयर करून अर्ध्या तासाच्या आत पाठवित होतो.

हे खरे नाही की, मी सरतपासातील सर्व मजकूर खोटा सांगत आहे. हे खरे नाही की, नि.क्र.४२ वरील सही माझी असून मी जाणूनबुजून खोटी सांगत आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपासः**– नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

स्वा/–

दिनांकः– ०५.०२.२०२४ (रा. सु. धडके)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लाखनी.